भारतीय पृथ्वि विज्ञान मंत्रालय, भारतीय हवामान शास्त्र विभाग आणि
डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली सहयोगीत

# –: ग्रामिण कृषि मौसम सेवा प्रकल्प :–

उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग

## हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला पत्रक - सिंधुदुर्ग
## कालावधी (दिनांक १२.१०.२०१९ ते १६.१०.२०१९)

| अंक ८२/२०१९ | दिनांक ११.१०.२०१९ | कालावधी ५ दिवस |
|---|---|---|

| मागील आठवड्यातील हवामान घटकांची प्रत्यक्ष नोंद (०५/०९/२०१९ ते ११/१०/२०१९ पर्यंत) | | | | | | | हवामान घटक | पूढील पाच दिवसांचे हवामान घटकांचे पूर्वानुमान (वैधता १२/१०/२०१९ ते १६/१०/२०१९ पर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०५/१० | ०६/१० | ०७/१० | ०८/१० | ०९/१० | १०/१० | ११/१० | दिनांक | १२/१० | १३/१० | १४/१० | १५/१० | १६/१० |
| ३.६ | ०.० | ०.० | २५.४ | ५.० | ०.० | ०.० | पाऊस (मि. मी) | ३३ | ३१ | २९ | १० | ० |
| ३५.० | ३५.० | ३५.० | ३५.० | ३५.० | ३५.० | ३४.५ | कमाल तापमान (अं. से) | ३४ | ३४ | ३५ | ३५ | ३६ |
| २४.० | २४.० | २३.० | २३.० | २३.० | २३.० | २३.० | किमान तापमान (अं. से) | २५ | २५ | २५ | २६ | २६ |
| ढगाळ | निरभ्र | ढगाळ | ढगाळ | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | सकाळ – मेघाच्छादन (ऑक्टा.) | ७ | ६ | ८ | ८ | ८ |
| निरभ्र | निरभ्र | ढगाळ | निरभ्र | ढगाळ | निरभ्र | निरभ्र | दुपार – मेघाच्छादन (ऑक्टा.) | | | | | |
| ९५ | ९२ | ९५ | ९२ | ९२ | ९० | ९० | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ९२ | ९१ | ८८ | ८४ | ७५ |
| ५२ | ५७ | ९० | ६२ | ५७ | ६२ | ५५ | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ६४ | ६२ | ६९ | ६१ | ४६ |
| ०.५ | १.१ | १.१ | ०.६ | ०.७ | ०.३ | १.३ | वा-याचा वेग (कि.मी/तास) | ००४ | ००५ | ००६ | ००७ | ००७ |
| स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | सकाळ – वा-याची दिशा | पूर्वे कडून | ईशान्ये कडून | ईशान्ये कडून | ईशान्ये कडून | पूर्वे कडून |
| पश्चिमे | पश्चिमे | आग्नेये | पश्चिमे | आग्नेये | दक्षिणे | स्थिर | दुपार – वा-याची दिशा | | | | | |

| मागील वर्षातील (२०१८) पर्जन्य (मि. मी) | १/०१/२०१९ पासुनचे पर्जन्य (मि. मी) | १/०६/२०१९ पासुनचे पर्जन्य (मि. मी) | मागील आठवड्यातील पर्जन्य (मि.मी) |
|---|---|---|---|
| ३२६९.२ | ४२५८.२ | ४२५८.२ | ३४.० |

**पुढील ५ दिवसाच्या हवामानाची सामान्य स्थिती:** येत्या ५ दिवसात जिल्ह्यात मध्यम स्वरुपाचा पाऊस पडण्याची शक्यता असुन वातावरण ढगाळ राहण्याची शक्यता आहे.

## हवामान पुर्वानुमान कृषि सल्ला

| पिकाचे नाव | पिकाची अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| भात | काढणी | भात कापणीसाठी विद्यापीठाने विकसीत केलेल्या “वैभव विळ्याचा” वापर करावा जेणेकरुन भात जमिनीलगत कापले जाईल.<br>जिल्ह्यात काही ठिकाणी हळव्या जातीच्या भात पिकांची कापणी करण्यात आली असून कापलेल्या भाताच्या पेंड्या झाकुन ठेवण्यात याव्यात व ज्यांना कापणी करावयाची आहे त्यांनी पाऊसाचा अंदाज पाहून कापणी करावी.<br>गरव्या जातीच्या भातासाठी बाहेरुन पाण्याची व्यवस्था करावी.<br>भातामध्ये लोंब्या येण्यापुर्वी १० दिवस व लोंब्या आल्यानंतर १० दिवसांपर्यंत शेतातील पाण्याची पातळी १० सेमी ठेवावी. पिकातील दाणे भरेपर्यत पाण्याची पातळी ५ सेमी ठेवावी. त्यानंतर कापणीपुर्वी ८ ते १० दिवस शेतातील पाणी काढावे.<br>कापणीसाठी तयार झालेल्या भातावर कोणतीही फवारणी करु नयेत. |
| आंबा | पालवी पुर्व | आंब्यामध्ये भिरुड (खोड किडा) या किडीचा प्रादुर्भाव आढळुन आल्यास प्रादुर्भित फांद्यामधुन तारेच्या हुकाने अळ्या काढुन टाकुन छिद्रात ईडीसीटी मिश्रण किंवा बोअरर सोल्युशन ओतावे किंवा अल्युमिनीयम फॉस्फाईड्ची एक गोळी टाकावी आणि छिद्र बंद करुन घ्यावे.<br>आंब्यास पालवी येण्यापुर्वी आंब्यामध्ये रोगट व सुकलेल्या फांद्या, बांडगुळे कापुन घ्यावीत व त्या ठिकाणी १ टक्का बोर्डो मिश्रण लावावे.<br>आंबा पालवीवर करपा रोगाचा प्रादुर्भाव आढ्ळुन आल्यास नियंत्रणासाठी आवश्यकतेनुसार प्रोपिनेब ०.२ % (२० ग्र. /१० लि. पाणी) या बुरशिनाशकाची फवारणी घ्यावी.<br>आंब्यामध्ये नविन पालवी आली असल्यास त्या पालवीचे तुडतुडे, शेंडा पोखरणारी अळी, पाने पोखरणारी अळी आणि मिजमाशीपासून आवश्यकतेनुसार संरक्षण करावे. त्यासाठी २५% प्रवाही डायमिथोएट किंवा ३६% प्रवाही मोनोक्रोटोफॉस ११ मिलि प्रति १० लि पाण्यात मिसळुन फवारणी करावी. |
| काजु | पालवी पुर्व | काजुवर खोड्किडा (रोठा) या किडिचा प्रादुर्भाव आढ्ळुन आल्यास १५ मि.मी. पटाशिच्या सहाय्याने प्रादुर्भित साल काढून झाडातील रोठ्याला बाहेर काढून मारुन टाकावे व तो भाग २०% प्रवाही क्लोरोपायरीफॉस ५० मी.लि. १० लिटर पाण्यामध्ये मिसळून चांगला भिजवावा. काजुमध्ये जुन्या व रोगट फांद्या कापल्यानंतर त्या ठीकाणी १% बोर्डोमिश्रन लावावे. |
| नारळ, सुपारी | फुलोरा | विद्यापिठाने शिफारस केल्याप्रमाणे नारळाला खताचा दुसरा हप्ता ७५० ग्र. युरिया ६६० ग्र. म्युरेट ऑफ पोटॅश प्रति माड या प्रमाणात द्यावा. खते द्यावयाच्या वेळी जमिनीत पुरेसा ओलावा असेल याची खात्री करावी. |
| भाजीपाला | काढणी | फळमाशीच्या नियंत्रणासाठी विद्यापीठाने विकसित केलेले क्यु लुर युक्त रक्षक सापळे हेक्टरी ४ या प्रमाणात लावावेत. नवीन वेलींचे पाने खाणारी अळी, मावा इ. किडींपासून संरक्षण करावे. वेलींचे पाने खाणारी अळी, मावा इ. किडींपासून संरक्षण करण्यासाठी मॅलॅथिऑन २ मि.ली. किंवा डायमिथोएट १.५ मि.ली. प्रती लि. पाण्यात मिसळून १०-१५ दिवसांच्या अंतराने फवारणी करावी. |
| दुभती जनावरे, शेळ्या व कुक्कुटपालन | - | जनावरांना पिण्यासाठी स्वच्छ कोमट पाणी व खाण्यासाठी हिरव्या ओल्या चा-याची व्यवस्था करावी.<br>पशुवैद्यकाच्या मार्गदर्शनाखाली गाई व म्हशींना पायलाग रोग प्रतिबंधक लसीकरण करुन घ्यावे.<br>पशुवैद्यकाच्या मार्गदर्शनाखाली शेळ्यांना पी.पी.आर (माथा) रोग प्रतिबंधक लसीकरण करुन घ्यावे. कोंबड्यांचे उन्हापासून संरक्षण करावे. |

सदर कृषि सल्ला पत्रिका ही डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठाच्या, प्रादेशीक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ले व उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे येथील “ग्रामीण कृषि मौसम सेवा” योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशी वरुन तयार करुन प्रकाशित करण्यात आली.


डॉ. प्रदिप चं. हळदवणेकर
सहयोगी अधिष्ठाता
उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे
ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग

डॉ. प्रदिप चं. हळदवणेकर
नोडल ओफिसर
(ग्रामिण कृषि मौसम सेवा)
उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे
(०२३६२-२४४२३१)

डॉ. यशवंत चं. मुठाळ
तांत्रिक अधिकारी
ग्रामिण कृषि मौसम सेवा
उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे
(०२३६२-२४४२३१)